॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

## जनसंपर्क विभाग

जळगाव प्रतिनिधी - पर्यावरण रक्षण, उद्योगांची जबाबदारी आणि भविष्यातील शाश्वत विकास यांचा संगम म्हणजे ग्रीन केमिकल इंजिनिअरिंग. या क्षेत्रात विद्यार्थ्यांना भरपूर संधी असून विद्यार्थ्यांनी यात संशोधन केले पाहिजे तसेच विकसित भारत २०४७ घडवायचा असेल तर त्यासाठी देशाचा जीडीपी वाढवावा लागेल व त्यासाठी रसायन तंत्रज्ञानाचा सहभाग मोठा असेल असे प्रतिपादन पद्मश्री प्रा. जी. डी. यादव यांनी केले.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील रसायन तंत्रज्ञान संस्था व पी.एम. उषा अंतर्गत आयोजित द्विदिवसीय "Advances in Chemical Technology and Allied Sciences” (रसायन अभियांत्रिकी व संलग्न विज्ञान क्षेत्रातील नव्या संशोधन प्रवाहांवर चर्चा व ज्ञानविनिमय) या विषयावरील आंतरराष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन दि. ६ व ७ जानेवारी रोजी करण्यात आले आहे.

यावेळी मंचावर अध्यक्षस्थानी कुलगुरू प्रा. व्ही एल माहेश्वरी, मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. आर डी कुलकर्णी (दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून उपस्थित), प्र-कुलगुरू एस. टी. इंगळे, विज्ञान व तंत्रज्ञान विद्या शाखेचे अधिष्ठाता प्राचार्य एस. एस. राजपूत, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, संचालक प्रा. ए. के. गोस्वामी, समन्वयक डॉ. राजकुमार शिरसाम उपस्थित होते.

आज या चर्चासत्राच्या उद्घाटन प्रसंगी पद्मश्री प्रा. जी. डी. यादव बोलत होते. ते म्हणाले की, ए आय व आयटीच्या युगात रसायन शास्त्राचे महत्त्व कमी होऊ शकत नाही कारण मानवाच्या दैनंदिन जीवनात रसायन शास्त्राची भूमिका महत्वाची आहे. रसायनशास्त्रच्या माध्यमातून प्रदूषणासंदर्भात बरेच गैरसमज आहेत परंतु ग्रीन केमिकल इंजिनिअरिंग द्वारे त्यावर मात करता येणे शक्य आहे. विद्यार्थ्यांना रसायन शास्त्राच्या अभ्यासक्रमांकडे वळविण्यासाठी पालक व शिक्षकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. उद्योगांकडून खर्च होत असलेल्या सामाजिक उत्तरदायित्व निधीतील १ टक्के रक्कम ही उच्च शिक्षणासाठी खर्च होणे आवश्यक आहे. त्यामुळे उच्च शिक्षणात विद्यार्थ्यांचा वाटा वाढवून विकसित भारताच्या दृष्टीने मार्गक्रमण करणे शक्य होईल.

आजच्या कार्यक्रमात मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी यांचे रसायन तंत्रज्ञान क्षेत्रातील योगदानाबद्दल त्यांना जीवन गौरव सन्मानपत्राने गौरविण्यात आले. यावेळी त्यांनी बोलताना म्हटलं की, विद्यापीठीय रसायन तंत्रज्ञान संस्थेच्या माध्यमातून चांगले विद्यार्थी घडविण्याचे काम अविरतपणे सुरू आहे. विद्यार्थ्यांना संशोधना संदर्भात मदत करण्याचा आलेख या संस्थेचा वाढतच चालला आहे असे म्हणत त्यांनी सहकार्य केल्याबद्दल व पुरस्काराबद्दल विद्यापीठाचे आभार मानले.

यावेळी अध्यक्षीय समारोपात बोलताना कुलगुरू प्रा. माहेश्वरी म्हणाले की, रसायन तंत्रज्ञान हे संस्कृती आणि मूलतत्त्वाचा आदर्श गाभा आहे. रसायन तंत्रज्ञान हे प्रदूषणाचे खरे कारण नसून मानवी लालसा हे प्रदूषणाचे खरे कारण आहे. आजच्या चर्चासत्रात संशोधक तरुण विद्यार्थी यांचा सहभाग वाढला ही आनंदाची बाब आहे.

प्रास्ताविक करताना संचालक प्रा. ए के गोस्वामी यांनी या चर्चासत्रा मागील उद्देश व या चर्चासत्रात ४२५ संशोधकांचा सहभाग असल्याचे सांगितले. या दोन दिवसांत १९ तज्ज्ञांचे मार्गदर्शन व पोस्टर प्रेझेंटेशन होणार असल्याचे देखील त्यांनी सांगितले.

**सामंजस्य करार** : विद्यापीठाने जम्मू येथील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी या संस्थेशी सामंजस्य करार यावेळी केला. करारावर जम्मू येथील प्रा. योगेंद्र निमदेव यांनी तर विद्यापीठाकडून कुलसचिव डॉ. विनोद पाटील यांनी स्वाक्षरी केल्या. या कराराच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना इंटर्नशिप, विद्यार्थ्यांसाठी सुलभ प्रवेश प्रक्रिया, संशोधन सहाय्य, थेट प्रवेश व संयुक्त विद्यमाने वर्कशॉप सेमिनारच्या आयोजन करण्यात येणार आहे.

**संकेतस्थळाचे उद्घाटन** : रसायन तंत्रज्ञान संस्थेतर्फे www.ats@nmu.ac.in या संकेतस्थळाचे उद्घाटन करण्यात आले. या संस्थेकडून संशोधनासाठी असलेल्या विविध नमुन्यांचे निष्कर्ष तपासणीची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

तसेच यावेळी भारतीय केमिकल इंजिनिअर संस्थेशी संलग्न विद्यापीठातील रसायन तंत्रज्ञान संस्थेतील विद्यार्थी यांनी तयार केलेल्या स्टूडेंट चॅप्टर माहितीपत्रकाचे विमोचन करण्यात आले. याद्वारे विद्यार्थ्यांकडून विविध कार्यक्रम घेतले जाणार आहेत.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. जी. ए. उस्मानी तर आभार प्रदर्शन डॉ. राजकुमार शिरसाम यांनी केले. यावेळी प्रा. उज्वल पाटील, प्रा. तुषार देशपांडे, प्रा. विशाल पराते, प्रा. भूषण चौधरी, प्रा. महेंद्र बारी, प्रा. उदय बागले व इतर शिक्षक, शिक्षकेतर अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

उद्घाटन सत्रानंतर पद्मश्री प्रा. जी. डी. यादव यांचे 'नेट - निगेटिव्ह ऊर्जा प्रणाली शाश्वततेसाठी हरित हायड्रोजन, जैव वस्तू मूल्यवर्धन कार्बोनेशन आणि कचरा प्लास्टिक पुनरचक्रनाचा प्रभावी वापर' या विषयावर बीज भाषण झाले. दुपार सत्रात प्रा. जे. बी. नाईक यांच्या अध्यक्षतेखाली सत्र संपन्न झाले. त्यामध्ये प्रा. शिरीष सोनवणे एन.आय. टी. वारंगल, डॉ. योगेश निमदेव जम्मू, डॉ. एच. डी. सेटियाबुदी मलेशिया पहांग विद्यापीठ, डॉ. राघवेंद्र सिंग ठाकूर, बिलासपूर यांची व्याख्याने झाली. दुसऱ्या सत्रात प्रा. भूषण चौधरी यांच्या अध्यक्षतेखाली डॉ. रुपेश टोपे मुंबई, प्रा. आर. महेंद्र तंजावर, डॉ. मयूर लाडोळे मुंबई, प्रा. पेट्रा पटाकोवा झेक रिपब्लिक यांची व्याख्याने झाली.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२६ दिनांक: ६ जानेवारी, २०२६

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता

## जनसंपर्क विभाग

जळगांव दि.६ (प्रतिनिधी): मुद्रणकलेनंतर जर कोणती मोठी क्रांती झाली असेल, तर ती कृत्रिम बुद्धीमत्ता (एआय) तंत्रज्ञानाची आहे. पत्रकारितेत अनेक नवे प्रयोग झाले असले, तरी मानवी मेंदूला टक्कर देण्याची क्षमता असलेली कृत्रिम बुद्धीमत्ता ही अत्यंत संवेदनशील बाब असून, तिचा वापर पत्रकारांनी अधिक सजगता आणि विचारपूर्वक करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्रा. डॉ. सदानंद मोरे यांनी केले.

मराठी पत्रकार दिनानिमित्त महाराष्ट्रातील दहा विद्यापीठांच्या जनसंवाद व पत्रकारिता विभागांतर्फे मंगळवारी (६ जानेवारी) 'कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आणि माध्यमे' या विषयावर विशेष ऑनलाइन व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. ऑनलाईन व्याख्यानाचे हे सहावे वर्ष असून यावेळी पुणे विद्यापीठाच्या पुढाकाराने विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले. या संयुक्त कार्यक्रमात कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ (जळगाव), राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ (नागपूर), शिवाजी विद्यापीठ (कोल्हापूर), सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ (पुणे), डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ (छत्रपती संभाजीनगर), पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ (सोलापूर), मुंबई विद्यापीठ, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ (नांदेड), गोंडवाना विद्यापीठ (गडचिरोली) आणि श्रीमती दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ (मुंबई) सहभागी झाले होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. सदानंद मोरे होते. प्रमुख वक्ते म्हणून ज्येष्ठ पत्रकार डॉ. धनंजय बिजले आणि प्रा. डॉ. योगेश बोराटे यांनी मार्गदर्शन केले. प्रा. डॉ. मोरे यांनी पत्रकारितेच्या विकासाचे विविध टप्पे स्पष्ट करताना सांगितले की, कृत्रिम बुद्धीमत्तेचा शोध अनेक वर्षांपूर्वी लागला असला, तरी सध्या तिचा वापर सर्वच क्षेत्रांत झपाट्याने वाढत आहे. प्रत्येक तंत्रज्ञानाला जसे सकारात्मक व नकारात्मक पैलू असतात, तसेच एआयचेही आहेत. त्यामुळे पत्रकारांनी एआय-साक्षर होत या तंत्रज्ञानाचा विवेकपूर्ण वापर करणे गरजेचे आहे.

ज्येष्ठ पत्रकार डॉ. धनंजय बिजले यांनी एआयमुळे बातम्यांमध्ये साचेबद्धता वाढण्याचा धोका असल्याचे नमूद केले. वृत्तपत्रांच्या मांडणीसाठी, मुद्रित शोधासाठी तसेच आकर्षक हेडींगसाठी एआयचा वापर होत असला, तरी चुकीची माहिती प्रसारित होण्याचा धोका वाढल्याने फॅक्ट-चेकिंगला अधिक महत्त्व देणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रा. डॉ. योगेश बोराटे यांनी माध्यमांमध्ये एआयचा बहुआयामी वापर कसा करता येईल, याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. एआयचा उपयोग केवळ मजकूरनिर्मितीपुरता न ठेवता संशोधन पत्रकारितेसाठीही प्रभावीपणे करता येऊ शकतो, असे त्यांनी नमूद केले.

ऑनलाइन व्याख्यानात, प्रा. डॉ. निशा मुडे-पवार (विभागप्रमुख, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर), प्रा. राम भावसार (प्र-संचालक, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव), प्रा. डॉ. संजय तांबट (विभागप्रमुख, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे), प्रा. डॉ. माधवी रेड्डी (विभागप्रमुख, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे), प्रा. डॉ. दिनकर माने (विभागप्रमुख, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर), प्रा. डॉ. सुहास पाठक (संचालक, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड), प्रा. डॉ. प्रभाकर कोळेकर (प्र-विभागप्रमुख, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर), प्रा. डॉ. प्रबास साहु (प्र-विभागप्रमुख, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर), प्रा. डॉ. सुंदर राजदिप (विभागप्रमुख, मुंबई विद्यापीठ, मुंबई), प्रा. डॉ. मीरा देसाई (विभागप्रमुख, श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई) आणि प्रा. डॉ. सरफराज अन्सारी (विभागप्रमुख, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली) यांनी मनोगत केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. संजय तांबट यांनी केले. सुत्रसंचालन डॉ. तेजस्विनी कांबळे यांनी केले. डॉ. गोपी सोरडे यांनी आभार मानले. यशस्वीतेसाठी प्रा. रोहित देशमुख, मंगेश बाविसाने, डॉ. वृषाली बर्गे, डॉ. मनीषा मोहोड, यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमात राज्यातील विविध विद्यापीठांतील शेकडो विद्यार्थी, प्राध्यापक आणि पत्रकारांनी सहभाग नोंदविला.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२६ दिनांक: ६ जानेवारी, २०२६

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## जनसंपर्क विभाग

जळगाव, (दि.०६) प्रतिनिधी - कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या केंद्रिय प्रशिक्षण व नियुक्ती कक्ष , स्कूल ऑफ मॅनेजमेंट स्टडिज यांच्या संयुक्त विद्यमाने प्रोजेक्ट इन्फोसिस बीपीएम, बंगळूर यांच्या मार्फत एमबीए, बी.कॉम व बी.बी.ए. या अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांसाठी दि. ०५ जानेवारी ते २१ जानेवारी या कालावधीत १५ दिवसांचा स्टुडंट्स डेव्हलपमेंट ट्रेनिंग प्रोग्राम आयोजित करण्यात आला आहे. या उपक्रमात विद्यापीठातील ६० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला आहे.

या प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्घाटन विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विनोद पाटील यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी प्रोजेक्ट इन्फोसिस बीपीएमचे प्रतिनिधी विश्वनाथ कल्याण, व्यवस्थापन शास्त्र प्रशाळेच्या संचालिका प्रा.मधुलीका सोनवणे , केंद्रिय प्रशिक्षण व नियुक्ती कक्षाचे समन्वयक प्रा. उज्वल डी. पाटील, उपसमन्वयक प्रा. रामेश्वर चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती.

उद्घाटनप्रसंगी मार्गदर्शन करताना कुलसचिव डॉ. विनोद पाटील म्हणाले की, विद्यार्थ्यांनी अशा प्रकारच्या कौशल्यविकास प्रशिक्षण कार्यक्रमांमध्ये जास्तीत जास्त सहभाग घ्यावा. आजच्या स्पर्धात्मक युगात केवळ शैक्षणिक ज्ञान पुरेसे नसून संवादकौशल्य, व्यक्तिमत्त्व विकास आणि व्यावसायिक कौशल्ये आत्मसात करणे अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. या १५ दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये विद्यार्थ्यांना भाषा व संवाद कौशल्ये, व्यक्तिमत्त्व विकास, व्यावसायिक संवाद, मुलाखत कौशल्ये तसेच विविध प्रकारच्या प्रशिक्षणात्मक उपक्रमांच्या माध्यमातून प्रत्यक्ष अनुभवातून शिकता येणार आहे. या प्रशिक्षणामुळे विद्यार्थ्यांची रोजगारक्षमतेत निश्चितच वाढ होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

याप्रसंगी व्यवस्थापन शास्त्र प्रशाळेच्या संचालिका प्रा. मधुलीका सोनवणे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत प्रशिक्षणाचा पूर्ण लाभ घेण्याचे आवाहन केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन प्लेसमेंट ऑफिसर सोनाली दायमा यांनी केले.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२६ दिनांक: ६ जानेवारी, २०२६

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता